# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


## पिसाट दिवाभीतांचा आणखी एक हल्ला!

संपादकीय

देशातील नरेंद्र मोदी यांच्या सरकारला १०० दिवस पूर्ण होत होते आणि त्याच्या पूर्वसंध्येला पुण्यातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयावर देशातील सर्वात हिंसक आणि पिसाट अशा संघपरिवाराने हल्ला केला. त्यांनी पाठविलेल्या १५-२० जणांच्या टोळक्याने केवळ तीन मिनिटांच्या अवधीमध्ये कार्यालयातील काचा फोडून, तेथे सर्वत्र जळके तेल आणि कसले तरी रसायन टाकले. कदाचित त्यांचा पेटविण्याचादेखील इरादा असू शकतो. तेथील असंघटित कामगारांची कागदपत्रे विद्रूप केली. कार्यालयातल्या कार्यकर्त्यांना धक्काबुक्की केली आणि ते पळून गेले.

मोदी सरकारचे उर्वरित दिवस काय असतील, याची झलक आणि मिळालेल्या यशाचा उत्सव सुरू झाला. संघपरिवाराने संघटित केलेल्या या आणखी एका पिसाट हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. केरळमधील कन्नूर जिल्ह्याचे पक्ष सचिव कॉ. जयराजन् यांच्यावर भीषण खुनी हल्ला करणाऱ्यांपैकी एक आणि त्यासाठी १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आलेला, रा.स्व. संघाचा कार्यकर्ता मनोज याच्या हत्येची पार्श्वभूमी यास असल्याचा कांगावा केला जात असला, तरी हे सत्य नाही. मनोजच्या हत्येमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कसलाही संबंध नाही. अशा सर्वच हत्यांचा आम्ही निषेधच करत आलेलो आहोत. तेथील पक्षानेदेखील याबाबत दिलेल्या निवेदनात ह्या घटनेचा निषेध करून त्याचा संपूर्ण आणि नि:पक्ष तपास करण्याची मागणी केलेली आहे.

पण तसे पाहिले, तर मोदींच्या आक्रमक प्रचार लाटेची सुरुवात १ वर्षापूर्वीच झाली. याच पुण्यात आणि रा.स्व.संघाच्या मुख्य परिसरातच अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे संस्थापक आणि प्रभावी सामाजिक विचारवंत-संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मोदी सरकार निवडून येताच, मोदींच्या विजयाचा हिंसक उन्माद म्हणून माहिती तंत्रज्ञान अभियंता मोहसीन शेख याची, हिंसक हिंदू राष्ट्र सेनेने केवळ त्याच्या मुस्लीम परिवेशाच्या कारणासाठी हत्या केली.

पुण्यातच नव्हे , तर देशात गेल्या एक वर्षात हेच घडले. उत्तर प्रदेशमध्ये भाजपचे त्यावेळचे उत्तर प्रदेशचे प्रभारी अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली जातीय दंग्याच्या सुमारे २५० घटना घडविण्यात आल्या. त्याचे फल म्हणून उत्तर प्रदेशमध्ये संपूर्ण सामाजिक वातावरण जातीय-धार्मिक तणावाखाली गेले. परिणामी भाजपला अभूतपूर्व निवडणूक यश मिळाले. अमित शहा यांना स्वत:ला भाजपचे अध्यक्ष म्हणून बढती मिळाली.

गेल्या ७ वर्षांत पुण्यातील पक्ष कार्यालयावर झालेला हा तिसरा हल्ला आहे. प्रथम २००७ मध्ये बंगालमधील नंदीग्राममधील तृणमूल-माओवादी यांच्या पुण्यातील समर्थकांनी कार्यालयावर हल्ला केला होता. त्यानंतर एकच वर्षात संघ परिवाराच्या आदेशानुसार भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी स्वत: सहभागी होऊन केरळमधील घटनांचा सूड म्हणून पक्षाच्या कार्यालयावर हल्ला केला आणि आता हा तिसरा हल्ला आहे.

पण त्याविरोधात राज्याच्या सत्तास्थानी असणाऱ्या राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडीला फारसे काहीच पडलेले नाही. ते आपापसातल्या झोंबाझोंबीमध्ये मग्न आहेत. माध्यमांमधून शेकडो कोटी रुपयांच्या जाहिराती जनतेच्या पैशातून देऊन त्यांनी माध्यमांना पूर्ण उपकृत केले आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्था या फॅसिस्ट जमातवाद्यांच्या हातात गेली, तरी त्याची त्यांना फारशी फिकीर नाही.

प्रश्न केवळ कार्यालयावर झालेल्या हल्ल्याचा नाही, तर देशात येऊ घातलेल्या भीषण

**फॅसिस्ट संकटाचा आहे. ५ सप्टेंबर रोजी पंतप्रधानांचे भाषण प्रत्येक शाळेत, प्रत्येक मुलाने ऐकण्याची सक्ती असो, बात्रा यांची बध्दडतेची प्रतीके असणारी धर्मांध पुस्तके असोत, राष्ट्रीय इतिहास संशोधन मंडळाच्या प्रमुखपदी कोणतेही शैक्षणिक-संशोधनात्मक योगदान नसणाऱ्या सुदर्शन राव यांची केलेली नियुक्ती असो, किंवा कामगार कायद्यांमध्ये कामगारांशी काहीही चर्चा न करताच प्रतिगामी बदल करणारी पावले असोत, आगामी काळाची ही सर्व चाहूल आहे.**

**इतकेच काय अगदी मोदी यांचा मंत्रीमंडळातील व्यवहारदेखील देशाची वाटचाल हिटलरशाहीकडेच सुरू झाल्याचे द्योतक आहे. जपानच्या दौऱ्यावर जाताना त्यांनी परराष्ट्रमंत्र्यांना सोबत न नेणे ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यांच्या मंत्रीमंडळात खरे तर फक्त एकच मंत्री आहेत. आणि ते म्हणजे नरेंद्र मोदी. बाकी सर्व फक्त सह्यांचे धनी आहेत.**

**पुण्याच्या पक्ष कार्यालयावर संघ परिवाराने केलेल्या या भेकड हल्ल्याचा महाराष्ट्रातील सर्व डाव्या, लोकशाही नि धर्मनिरपेक्ष शक्तींनी तीव्र निषेध केला व या शक्तींचे अनेक नेते राज्यभर झालेल्या निषेध निदर्शनांत स्वत: सहभागी झाले, ही स्वागतार्ह बाब आहे.**

**येत्या काळात राज्यातील-देशातील लोकशाही रक्षणासाठी सर्वच डाव्या पुरोगामी शक्तींनी व्यापक पायावरील एकजूट करण्याची गरज आहे. त्याचे स्वरूप केवळ निवडणुकांपुरतेच मर्यादित न ठेवता, घटनेतील लोकशाही मूल्ये-कलमे, सामाजिक सद्भाव, राष्ट्रीय एकात्मता या सर्व मुद्यांवर व्यापक कार्यक्रमांचे असावे लागेल. झालेल्या घटनांची तात्कालिक प्रतिक्रिया देणे एवढ्यापुरतेच या एकजुटीचे कार्य असता कामा नये. तर स्वत:हून स्वतंत्र पुढाकार घेऊन वरील व्यापक कार्यक्रमावर जनतेत सतत कार्यरत रहावे लागेल. त्यातूनच भारतीय घटनेचे मारेकरी कोण आणि रक्षक कोण याचा बोध जनतेला होईल. त्या आधारावरच मोदी-संघपरिवार तसेच एकूण धर्मांध-जातवादी राजकारण आणि त्यांचा भ्रष्ट दलाल भांडवलदारी चेहरा त्यांच्यासमोर येईल.**

□□□

# पुण्यातील माकप कार्यालयावर संघाच्या गुंडांच्या भ्याड हल्ल्याचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कमिटीतर्फे तीव्र निषेध!

पुणे येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयावर आज दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास काही गुंडांनी भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात कार्यालयात उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांना दुखापत झाली नसली तरी पक्ष कार्यालयातील फर्निचर व इतर वस्तुंची तोडफोड करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुंडांनी केलेल्या या भ्याड हल्ल्याचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची महाराष्ट्र राज्य कमिटी तीव्र धिक्कार करीत आहे.

या हल्ल्यात घर कामगार व असंघटित क्षेत्रातील कामगारांना युनियनमार्फत देण्यात येणाऱ्या ओळखपत्रांवर तेल व तत्सम केमिकल टाकून त्याची नासधूस करण्यात आली. हा हल्ला म्हणजे त्या कामगारांवर केलेला हल्ला आहे.

केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपचे सरकार आल्यानंतर देशात हिंदुत्ववादी संघटनांच्या अतिरेकी कारवाया वाढल्या आहेत. विविध ठिकाणी धार्मिक विद्वेष पसरवण्याचे काम संघ परिवाराकडून आणि त्यांच्या हिंदुत्ववादी संघटनांकडून होत आहे. पुणे पक्ष कार्यालयावर हल्ला करत असताना आम्ही केरळमधील हल्ल्याचा बदला घेत आहोत असे संघ कार्यकर्त्यांनी म्हटले. केरळमध्ये झालेल्या प्रकाराशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कसलाही संबंध नाही. केरळ पोलीस व तेथील न्यायव्यवस्था दोषींना शिक्षा करण्यास समर्थ आहेत. मात्र आम्ही केरळच्या प्रकरणाचा बदला घेत आहोत असे म्हणून पक्ष कार्यालयाची तोडफोड करणे म्हणजे कायद्याला आव्हान देण्यासारखे आहे. धर्मांध संघटनांच्या कारवायांकडे राज्य सरकार गंभीरपणे पाहत नसल्यामुळे अशा विघातक संघटनांचे फावत आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येचा तपास वर्ष उलटले तरी न लागणे, नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर येताच एका आठवड्याभरातच पुण्यातच मोहसीन शेख या मुस्लीम तरुणाचा खून होणे, ही देखील त्याचीच उदाहरणे आहेत.

हिंदुत्ववादी संघटनांनी पुणे पक्ष कार्यालयावर केलेला हा दुसरा भ्याड हल्ला आहे. अशा हल्ल्यांना माकपचे कार्यकर्ते खंबीरपणे मुकाबला करण्यास सज्ज आहेत. राज्य सरकारने हल्लेखोरांना आणि त्यांच्या सूत्रधारांना अटक करण्याची मागणी पक्षाची राज्य कमिटी करत आहे. या भ्याड हल्ल्याविरोधात माकप व महाराष्ट्र डाव्या लोकशाही समितीने राज्यभर लगेच निषेध, निदर्शने करण्याची हाक दिली आहे. देशात भाजप आणि रा.स्व.संघ कार्यकर्त्यांच्या फॅसिस्ट प्रवृत्ती विरोधात एकत्र येण्याचे आवाहन सर्व लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष शक्तींना पक्ष करत आहे.

***(२ सप्टेंबर २०१४)*** **डॉ. अशोक ढवळे**

राज्य सचिव, माकप

# पुण्यातील पक्ष कार्यालयावर संघ परिवाराचा हल्ला पुरोगामी संघटनांच्या मोर्चामधून तीव्र निषेध

मंगळवार, दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजता राष्ट्रीय स्वयं सेवक संघाच्या १५ ते २० कार्यकर्त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पुण्यातील कार्यालयावर भ्याड हल्ला केला. यामध्ये त्यांनी पक्ष कार्यालयातील काचा फोडल्या, टेबल खुर्च्यांची व इतर फर्निचरची नासधूस केली. तसेच कार्यालयामध्ये सर्वत्र तेल व काळी शाई फेकली. बांधकाम कामगारांच्या कागदपत्रांची नासधूस केली. त्यामुळे बांधकाम कामगार त्यांना मिळणाऱ्या अनुदानापासून वंचित राहणार आहेत. यावेळी पक्ष कार्यालयामध्ये सतिश चव्हाण, थॉमस वर्गीस, पी. एस. साठे, गोविंद गोडबोले, सुरेश मोहिते, किरण भंडारी हे पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते. या कॉम्रेड्सनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुंडाना थोपवण्याचा प्रयत्न केला. केरळमध्ये रा.स्व. संघाच्या कार्यकर्त्यांवरील हल्ल्याचा बदला घेण्यासाठी आम्ही असेच हल्ले करू अशी हल्लेखोरांनी स्वत:हून वल्गना केली. यावेळी किरकोळ धक्काबुक्की झाली. आरडाओरडा झाल्यामुळे व पोलिसांच्या भीतीने हल्लेखोरांनी तातडीने पळ काढला. या हल्ल्याचे वृत्त समजताच अनेक पक्ष कार्यकर्ते, विविध पुरोगामी पक्ष-संघटनांचे कार्यकर्ते तसेच प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी पक्ष कार्यालयावर गर्दी केली.

या हल्ल्याच्या निषेधार्थ ३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता पक्ष कार्यालयापासून डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या ज्या ठिकाणी झाली, ते पक्षाच्या कार्यालयापासून जवळच असलेल्या ठिकाणी मोर्चा काढण्यात आला. तेथे म्हणजे बालगंधर्व रंगमंदिराजवळील, महर्षि शिंदे पुलावर सर्व पक्षीय जोरदार निषेध सभा घेण्यात आली. 'संघ परिवाराच्या हुकूमशाहीचा निषेध करा', 'मतभिन्नतेच्या स्वातंत्र्याचे रक्षण करा', 'लोकशाहीवर हल्ला करणाऱ्या धर्मांध दहशतवादाविरोधात एकजूट करा', 'हिंसेने विचार संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात संघर्ष करा' असे फलक व घोषणा मोर्चामध्ये देण्यात आल्या.

या सभेमध्ये ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव, समाजवादी विचारवंत आणि संपादक डॉ. कुमार सप्तर्षी, जनता दल (धर्मनिरपेक्ष)चे विठ्ठल सातव, आम आदमी पार्टीचे सुभाष वारे, काँग्रेस पक्षाचे अभय छाजेड, लीगल सोसायटीचे अनुप अवस्थी, रंगमंच अभिनेत्या सुषमा देशपांडे, सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल, हमाल पंचायतीचे नेते गोरख मेंगडे, लाल निशाण पक्ष (लेनिनवादी)चे भालचंद्र केरकर, मेधा थत्ते, माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य अजित अभ्यंकर, सीटूचे नेते सतिश चव्हाण, शुभा शमीम, वसंत पवार, जनवादी महिला संघटनेच्या नेत्या किरण मोघे, दलित महिला आघाडीच्या लता भिसे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे फत्तेसिंग पवार, लोकायत संस्थेच्या अलका जोशी, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे किशोर ढमाले, भारिपचे प्रा. म. ना. कांबळे, समाजवादी महिला सभेच्या वर्षा गुप्ते, रिक्षा पंचायतीचे नितीन पवार, दलित आदिवासी अधिकार मंचाचे प्रा. नितेश नवसागरे, विमा कामगार संघटनेचे चंद्रकांत तिवारी इ. पुरोगामी संघटना संस्थांचे नेते, कार्यकर्ते, कामगार, कष्टकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी सभेमध्ये आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.

'दाभोलकरांच्या हत्येपासून देशातील भय आणि दहशत यांच्या नव्या राज्याचे पडघम वाजू लागले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष कार्यालयावरील हल्ला हा त्याचाच एक भाग आहे. हा हल्ला म्हणजे संघ परिवाराने सर्व धर्मनिरपेक्ष लोकशाही मानणाऱ्यांना दिलेले आव्हान आहे. या भयराज्याच्या विरोधात एकजुटीने संघर्ष करण्याची तयारी आपण सर्वांनी करण्याची गरज आहे' असे विचार सर्व वक्त्यांनी मांडले.**– डॉ. महारुद्र डाके**

# अनुसूचित जातींवरील अत्याचारांच्या प्रकरणांत वाढ

**द नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो (एनसीआरबी)च्या अहवालानुसार अनुसूचित जातींवरील अत्याचारांच्या नोंद** केलेल्या प्रकरणांच्या प्रमाणात २०१२च्या तुलनेत २०१३ मध्ये १७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे आणि खटले निकाली होण्याचे प्रमाण २०१३ मध्ये फक्त २३ टक्के आहे. २०११ मध्ये ३९,५१२ प्रकरणे नोंदविली गेली तर २०१३ मध्ये त्यात बरीच वाढ होऊन ती संख्या ४६,११४ इतकी झाली. देशातील दहा राज्यांत यातील ९० टक्के प्रकरणे नोंदविली गेली आहेत. २०१३ मध्ये सर्वात जास्त ८,१२६ प्रकरणे राजस्थानात नोंदविली गेली आहेत. त्यानंतर उत्तर प्रदेश ७,०१३, बिहार ६,८१२, मध्य प्रदेश ४,२४१, ओरिसा ३,३८२, कर्नाटक ३,०७६, महाराष्ट्र २,०६४, तामीळनाडू १,८६७ आणि गुजरात १,४१४ प्रकरणे नोंदविली गेली आहेत.

प्रलंबित खटल्यांचे प्रमाण २०११ मध्ये ७९.९ टक्के होते. ते वाढून २०१३ मध्ये ८४.१ टक्के इतके झाले आहे. खटले निकालात काढण्याचे प्रमाण बिहारमध्ये १२.१ टक्के तर महाराष्ट्रात फक्त १० टक्के आहे. केरळात ११.७, गुजरात १०.२, हिमाचल प्रदेश १७.६ आणि कर्नाटकात २१.८ टक्के आहे.

बिहारमध्ये फक्त अॅट्रॉसिटीच्या कायद्याखालील खटले निकालात काढण्यासाठी ११ न्यायालये आहेत. केरळमध्ये २, कर्नाटकात ८, गुजरातमध्ये २५ न्यायालये आहेत तर महाराष्ट्र आणि हिमाचल प्रदेशात एकही असे न्यायालय नाही. मध्य प्रदेशात प्रत्येक जिल्ह्यात असे एक पोलीस स्टेशन निर्माण करण्यात आलेले आहे जे केवळ अॅट्रॉसिटीच्याच गुन्ह्याबाबत काम करते. अशा प्रकरणांचा तपास करण्यासाठी तेथे डेप्युटी सुपरिटेंडेड दर्जाचा पोलीस अधिकारी नेमण्यात आलेला आहे. राज्यात ४५ खास न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

भारतीय दंडविधानाखाली दखलपात्र गुन्हे निकाली होण्याचे प्रमाण २०१३ मध्ये ४०.२ टक्के आहे. तर अॅट्रॉसिटीच्या कायद्याखालील दखलपात्र गुन्हे निकाली होण्याचे प्रमाण २२.३ टक्के आहे. ते २०११ पेक्षा ३० टक्क्यांनी खाली आलेले आहे. अॅट्रॉसिटी कायद्याखाली अंमलबजावणी तसेच अन्यायग्रस्तांना मदत आणि पुनर्वसन यावर देखरेख करण्यासाठी स्थापन करावयाच्या उपविभागीय पातळीवरील समित्या फक्त महाराष्ट्र, हरयाणा आणि त्रिपुरा या राज्यांनी स्थापन केलेल्या आहेत.

*('द हिंदू'मधील बातमीच्या आधारे)* **– राजीव देशपांडे**

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरोची निवेदने

## नियोजन आयोग गुंडाळण्यास विरोध

नियोजन आयोगाचा गाशा गुंडाळण्याचा निर्णय पंतप्रधान मोदी यांनी जाहीर केला आहे. संसदेत कोणतीही चर्चा न करता किंवा एकाही राजकीय पक्षाबरोबर अगर संबंधित संस्थांशी कोणताही विचारविमर्श न करता संसदेचे अधिवेशन संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी हे पाऊल जाहीरपणे उचलले गेले आहे. बाजारकेंद्री अर्थव्यस्थेत नियोजनाची अगदी दाखविण्यासाठीसुद्धा गरज नाही ह्या नवउदारवादी दृष्टीकोनाला अनुसरून हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

गेल्या दोन दशकांपासून उदारीकरणाच्या धोरणानुसार नियोजन आयोगाच्या भूमिकेवर खूपच नियंत्रण आले होते. मोदींनी फक्त शेवटचा धक्का देण्याचे काम केले. विभागीय असमतोलाचे भान ठेवत समतोल विकासासाठी योजने अंतर्गत असणाऱ्या विशिष्ट स्रोतांच्या वाटपाचे काम तसेच काही महत्वाच्या योजनांवर आणि प्रकल्पांवर नियंत्रण ठेवण्याचे काम नियोजन आयोगाद्वारे होत होते.

संघराज्याच्या संकल्पनेशी नियोजन आयोगाचा मेळ नसल्याचा दावा मोदी सरकारने केला आहे. म्हणूनच नियोजन आयोगाला राष्ट्रीय विकास संस्थेची कार्यकारी शाखा बनवावी असा आग्रह मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून धरण्यात आला होता. त्यामुळे नियोजन आयोग ही खरीखुरी संघराज्यीय संस्था बनली असती. पण जर नियोजन आयोग मोडीत काढले गेले तर राज्यांना करावयाच्या वाटपाचे निर्णय अर्थ मंत्रालयाकडून घेतले जातील व त्यामुळे राज्यांचा विचार करता अधिकच केंद्रीयकरण होईल व राजकीय हितसंबंधांना प्राधान्य दिले जाईल.

नियोजन आयोगाच्या जागी कोणती व्यवस्था आणली जाईल याबाबत मोदी सरकारने कोणतेही भाष्य केलेले नाही. आज जनतेच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी मुळातच अत्यल्प असणाऱ्या तरतुदीत आणखीन कपात केली जात आहे. त्यात मोदी सरकारच्या ह्या मनमानी पद्धतीच्या चालीमुळे केवळ खासगी भांडवलाच्या नफेखोरीला फायदा होणार आहे.

*१९ ऑगस्ट २०१४*

## शिक्षक दिन : सक्ती नको!

५ सप्टेंबरला शिक्षक दिना निमित्ताने होणारे पंतप्रधानांचे भाषण शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांनी ऐकावे यासाठी देशातील सर्व शाळांनी व्यवस्था करण्याचा फतवा मोदी सरकारने सर्व शाळांना पाठवला आहे. हे अभूतपूर्व आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात अशा प्रकारचे आदेश यापूर्वी कधीही देण्यात आले नव्हते. अगदी राष्ट्रपती अथवा पंतप्रधान यांच्या राष्ट्राला उद्देशून केलेल्या अनिवार्य भाषणांच्या संदर्भातही असे आदेश यापूर्वी कधीच काढण्यात आले नव्हते. पंतप्रधानांच्या लाल किल्ल्यावरून होणाऱ्या भाषणासाठीही असे आदेश कधीच देण्यात आलेले नाहीत. आरएसएस/भाजप या प्रसंगांचा वापर तरुणांची मने एकाच विचाराने भारावून टाकण्यासाठी करीत आहे आणि विविध विचारधारांना त्यांच्यापुढे खुलेपणाने मांडण्याऐवजी त्यांचे विचारविश्व संकुचित करीत आहे हेच यावरून स्पष्ट होत आहे.

शाळांनी या सूचना पाळल्याच पाहिजेत अशी सक्ती करण्यात आलेली नाही असा खुलासा मानव संसाधन विकास मंत्र्यांनी केला आहे. अर्थात या सूचना पाळण्यासाठी शाळेच्या प्रशासनावर आणि मुख्याध्यापकांवर दबाव टाकण्याची काहीच आवश्यकता नाही, कारण देशातील बहुतेक शाळा या एकतर सरकारी आहेत किंवा सरकारी अनुदानित आहेत.

१९७६ साली अंतर्गत आणीबाणीच्या काळात शिक्षणाला सामाईक यादीत टाकण्यात आले आणि प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी राज्यांकडेच ठेवण्यात आली. त्यामुळे काही राज्य सरकारांनी हा संघराज्य रचनेचा भंग आहे अशी तक्रार करीत आपला आक्षेप नोंदवला आहे. भारतीय संघराज्याच्या उभारणीच्या काळात राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती राहिलेले तत्वज्ञानी आणि शिक्षणतज्ज्ञ असलेल्या डॉ. एस. राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी शिक्षक दिन दरवर्षी साजरा केला जातो. त्या दिवशी आदर्श शिक्षकांचा गौरव केला जातो.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो अशा प्रकारच्या अभूतपूर्व फतव्यांना तीव्र विरोध करीत आहे आणि मोदी सरकारने ते मागे घ्यावेत अशी मागणी करीत आहे.

*३ सप्टेंबर २०१४*

## बिपीन चंद्र यांना श्रद्धांजली

३० ऑगस्टच्या सकाळी नामवंत इतिहासकार आणि कसदार लेखक बिपीन चंद्र यांचे नवी दिल्ली येथे दु:खद निधन झाले. प्रा. चंद्र हे जनतेचे इतिहासकार होते. धर्मनिरपेक्ष इतिहासासाठी त्यांचे लिखाण हा मूल्यवान ठेवा आहे. जनतेच्या इतिहासाची मांडणी धर्मनिरपेक्ष व्हावी यासाठी झालेल्या प्रयत्नांत त्यांनी अमूल्य योगदान दिलेले आहे.

बिपीन चंद्र आधुनिक भारताच्या आर्थिक आणि राजकीय इतिहासाचे तज्ञ मानले जात. राईझ अँड ग्रोथ ऑफ ईकॉनॉमिक नॅशनॅलिझम, इन द नेम ऑफ डेमॉक्रसी: द जेपी मूव्हमेंट अँड द इर्मजन्सी, नॅशनॅलिझम अँड कलोनिअलिझम इन मॉडर्न इंडिया आणि द मेकिंग ऑफ मॉडर्न इंडिया: फ्रॉम मार्क्स टू गांधी या पुस्तकांसहित त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. ते 'इनक्वायरी' या मासिकाचे संस्थापक होते आणि प्रदीर्घ काळ त्यांनी त्या मासिकाच्या संपादक मंडळावर काम केले. 'नॅशनल बुक ट्रस्ट'चे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते.

प्रा. बिपीन चंद्र यांच्या निधनामुळे भारत एका महान इतिहासकाराला, ज्ञान उदारपणे उधळणाऱ्या शिक्षकाला, उत्कट संशोधकाला आणि लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या संरक्षणासाठी चाललेल्या संघर्षातील एका सामर्थ्यवान आवाजाला मुकला आहे. आज हिंदुत्ववादी उजव्या शक्ती आक्रमक होत असताना बिपीन चंद्रांचे लिखाण धर्मांधता विरोधी संघर्षासाठीचा बाजूला सारता न येणारा शस्त्रांचा एक प्रचंड साठाच आहे.

*३० ऑगस्ट २०१४*

# 'भिरकावून द्या हा दुःखाचा प्याला' पोटनिवडणूक निकालांचा अन्वयार्थ

मोदी सरकारला शंभर दिवस पूर्ण व्हायच्या आठच दिवस आधी बिहार, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि पंजाबातील पोटनिवडणुकीच्या निकालांनी रा.स्व. संघ आणि भाजपला जोराचा झटका दिला. या राज्यांतील १८ मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. या आधी भाजपला त्यापैकी १६ जागा मिळाल्या होत्या. या पोटनिवडणुकीत मात्र १८ पैकी १० जागाच त्याच्या पदरात पडल्या. बिहारमधील १० जागी पोटनिवडणूक झाली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत या जागांपैकी तब्बल ८ विधानसभा मतदारसंघात भाजपला मतदानात आघाडी घेता आली होती. पण आता मात्र केवळ ४ जागाच त्याला मिळाल्या आहेत आणि त्याही अगदी कमी फरकाने. बांका या मतदारसंघातली जागा तर केवळ ७११ मतांनी जिंकता आली. या उलट, परबत्ता या मतदारसंघात जदयूने भाजप उमेदवाराचा तब्बल ६७,००० मतांनी दणदणीत पराभव केला.

मध्य प्रदेशातील तीन जागांपैकी भाजपने स्वत:ची एक जागा गमावली. तीच गत कर्नाटकामध्ये झाली. तेथेही एक जागा भाजपला गमवावी लागली. हे चित्र लोकसभेच्या निवडणुकीच्या अगदी उलटे आहे. तथाकथित मोदी लाटेला लागलेल्या ओहोटीचे ते द्योतक आहे. गेल्या महिन्यात उत्तराखंड राज्यात झालेल्या विधानसभेच्या तीन जागांच्या पोटनिवडणुकीत या तिन्ही जागांवर भाजपचा पराभव झाला. त्यापैकी २ जागा पूर्वी भाजपच्या होत्या.

लोकमतात झालेला हा निर्णायक बदल पचवायला प्रमुख वृत्तसमूहांना जडच जात आहे, असे दिसते. आढेवेढे घेत हा बदल मान्य करतही 'लोकमताविषयी घाईघाईने निष्कर्ष काढू नका', 'या निकालांतून जास्त अर्थ काढण्यात मतलब नाही' असा शहाजोग सल्ला द्यायला मात्र ते विसरत नाहीत. अर्थात, यात नवल वाटण्याचे कारण नाही. कारण भारतातील कॉर्पोरेट कंपन्या आणि त्यांचे वृत्तसमूह लोकसभा निवडणुकीत भाजपचे 'चिअर लीडर्स' म्हणूनच नाचत होते. त्या निवडणूक निकालानंतर 'मोदी त्सुनामी' म्हणत ते थयथय नाचत होते. पण इतक्या लवकर मोदीच्या प्रतिमेवरचा वर्ख निघू लागला, हेच मान्य करायला त्यांना जड जात आहे.

'टाइम्स ऑफ इंडिया' हे एक तथाकथित प्रतिष्ठित वर्तमानपत्र. २६ ऑगस्टच्या अंकाच्या संपादकीयात ते म्हणते, 'ही येणाऱ्या बदलाची नांदी असू शकते.' दुसरे एक वर्तमानपत्र मात्र इसापच्या गोष्टीचा दाखला देत म्हणते, 'आकाशात एकच दिवस ढग दिसला नाही तर लगेच वसंत ऋतू आला म्हणून नाचायचे कारण नाही.' थोडक्यात, शितावरून भाताची परीक्षा करायला ते नकार देते. दुसऱ्या एका वर्तमानपत्राच्या संपादकांनी अशीच री ओढली आहे. 'लोकांनी बिहारमधल्या राजद-जदयू-काँग्रेसच्या आघाडीच्या विजयात फार अर्थ शोधू नये', असा जावईशोध त्यांनी लावला.

आणि कोणत्या पार्श्वभूमीवर? अगदी कालपरवाच लोकसभेच्या निवडणुकीत भाजप आणि रामविलास पास्वानांच्या आघाडीने ६ विधानसभा मतदारसंघात आघाडी घेतली होती. त्यापैकी तब्बल ५ मतदारसंघात त्यांना जदयू आघाडीने धूळ चारली असताना. भाजपचा हा पराभव पचला नसला तरी हिंदुस्तान टाइम्सला २६ ऑगस्टच्या संपादकीयात मान्य करावे लागले, 'भारतीय राजकारणात निवडणुकीतील बेरजेचे गणित आणि जातींचे समीकरण एखाद्या पक्षाला होत्याचे नव्हते करू शकते, हे पुन्हा एकवार सिद्ध झाले आहे.' परंतु २७ ऑगस्टचा टाइम्स ऑफ इंडिया जदयू-राजदच्या या विजयात मिठाचा खडा टाकायला विसरत नाही, 'जदयू-राजदच्या आघाडीचा जुगार यशस्वी ठरला खरा. पण जातींची बेरीज केली म्हणजे योग्य प्रशासन करता येते, असे होत नाही.'

पोटनिवडणुकीचा हा निकाल असा सहजासहजी झटकता येईल काय? या आधी झालेल्या उत्तराखंडातील तीन मतदारसंघातील विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल काय सांगतात? त्या तीन जागांत भाजपच्या हातात आला होता, भला थोरला भोपळा. बिहारमध्येदेखील रा.स्व.संघ आणि भाजपच्या मतांच्या टक्केवारीत घसरण झाल्याचेच दिसून येते. आता निवडणूक झालेल्या दहा मतदारसंघात लोकसभेच्या निवडणुकीत त्याला ४५.३% मते मिळाली होती. पोटनिवडणुकीत ती घसरून झाली आहेत ३७.३%. या उलट राजद-जदयू आणि काँग्रेसच्या आघाडीची मते ४.६% वाढली आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत ती ४०.३% होती, ती आता झाली आहेत, ४४.९ %. लोकसभेच्या निवडणुकीत भाजप-पास्वान आघाडी १० पैकी ९ विधानसभा मतदारसंघात आघाडीवर होती. पोटनिवडणुकीत त्यांच्यावर चार जागांवरच समाधान मानायची पाळी आली आहे. चार वर्षापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीतदेखील भाजप आघाडीला या १० पैकी ७ जागा मिळाल्या होत्या. त्यापैकी एकट्या भाजपला मिळाल्या होत्या ६ जागा. हे दहाच्या दहा मतदारसंघ परंपरेने भाजपचे प्रबळ मतदारसंघ राहिलेले आहेत. २०१०च्या निवडणुकीत भाजपने या १० पैकी ८ जागा लढवल्या होत्या. त्यामुळे पोटनिवडणुकीचे निकाल हे केवळ जातींचे समीकरण आहे, म्हणून त्याची वासलात लावणे ही स्वत:चीच करून घेतलेली फसगत आहे.

अर्थात, जमातवादाला एकसंध आणि भक्कम पर्याय उभा रहाण्यासाठी हे यश पुरेसे नाही, हे खरेच. त्यासाठी बरेच अंतर कापावे लागणार आहे. पण लोकसभेच्या निवडणुकीत केलेल्या प्रचाराहून मोदींचा कार्यक्रम वेगळाच आहे, हे रा.स्व. संघ/भाजपच्या दुर्दैवाने जनतेला कळून चुकले आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली देशाला 'अच्छे दिन आनेवाले है!' असा लोकांचा तात्कालिक भ्रम झाला होता. पण गेल्या शंभर दिवसात त्या भ्रमाचा भोपळा फुटू लागला आहे. तेल-पदार्थांच्या वाढलेल्या किंमती, रेल्वेची भाडेवाढ तर मोदी सरकारने केली आहेच, परंतु अर्थव्यवस्था रुळावर यायची चिन्हेही दिसत नाहीत. नवा रोजगार नाही की लोकांचे दैन्य कमी व्हायची चिन्हे नाहीत. मोदींचे लाल किल्ल्यावरून भाषण करायचे स्वप्न पुरे झाले खरे, पण त्या भाषणात निवडणूक प्रचारात राळ उडवलेल्या घोषणांचा मागमूसदेखील नव्हता. भाववाढ रोखणे, भ्रष्टाचाराला लगाम घालणे, 'किमान शासन-कमाल प्रशासन' या कशाचाच उल्लेखदेखील नव्हता.

सरकारच्या या कार्यकालात आपल्याला आधी वाटत असलेली भीतीच खरी ठरू लागली आहे. धार्मिक तणावात एकदम भर पडली आहे. निवडणुकीवर डोळा ठेवून बिहारमध्येही असे धार्मिक तणाव वाढवण्याचा रा.स्व.संघ/भाजपने प्रयत्न केला होताच. महाराष्ट्र, हरयाणा, जम्मू-काश्मीर येथील विधानसभेची निवडणूक आणि उत्तर प्रदेशातील पोटनिवडणूक जवळ येईल तसतसे धार्मिक उन्माद आणि तणाव चेतवले जातीलच.

रा.स्व.संघ/भाजपच्या धर्मांध राजकारणाच्या भात्यातील अलिकडेच वापरात आलेले शस्त्र म्हणजे 'लव्ह-जिहाद'. तथाकथित लव्ह-जिहाद म्हणजे मुस्लिम तरुण हिंदू तरुणींना भुलवून त्यांचे धर्मांतर घडवून आणतात. हा विचार निखालसपणे तर्कदुष्ट तर आहेच, शिवाय दुष्टबुद्धीचा देखील आहे. लोकसभेत भाजपचा एकदेखील मुस्लिम खासदार नाही. याबाबतीत भाजप अत्यंत ढोंगी रीतीने वागत आहे. धर्मेंद्र आणि हेमा मालिनी हे भाजपचे सुप्रसिद्ध दाम्पत्य. धर्मेंद्र यापूर्वी एकदा भाजपचे खासदार होते आणि हेमा मालिनी २०१४ला निवडून आल्या आहेत. लग्नासाठी त्यांनी इस्लामचा स्वीकार केला होता, हे सर्वश्रुत आहे. सिकंदर बख्त हे भाजपचे एक लोकप्रिय नेते, ते जनता पक्षाच्या सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होते. या सिकंदर बख्त यांनी एका हिंदू मुलीशी विवाह केला आहे. आणि मुस्लिम विरोधी भावना चेतवण्यासाठी रा.स्व. संघ/भाजप तथाकथित 'लव्ह-जिहादच्या' अफवा उठवत आहेत!

असे असताना रा.स्व. संघ/भाजप 'लव्ह-जिहाद'चा नारा का देत आहे? उघड आहे. त्यांना देशात धार्मिक तणाव हवाच आहे. हिंदू व्होट बँक बळकट करायची आहे. यामुळे देशातील सामाजिक सलोखा धोक्यात येणार आहे. दुर्दैव असे की, सरकारमध्ये असलेल्या पक्षालाच ते हवे आहे. निवडणुकीतल्या राजकीय फायद्यासाठी आपल्या थोर देशाच्या एकात्मतेला नख लावायला हा राज्यकर्ता पक्ष मागेपुढे पहात नाही. हा प्रयत्न वेळीच रोखला नाही तर देशातील संपन्न वैविध्य नष्ट होईल; सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक वैविध्य नष्ट होऊन 'भारत' या मूळ संकल्पनेलाच सुरुंग लागेल. रा.स्व. संघाला या भारताचे रूपांतर फॅसिस्ट हिंदूराष्ट्रात करायचे आहे. या संदर्भात या पोटनिवडणुकांच्या निकालाचे महत्व ओळखले पाहिजे. जनतेने रा.स्व. संघ/भाजपचा हा डाव हाणून पाडायची चुणूक दाखवली आहे. आम्हाला असे भारताचे असहिष्णु, फॅसिस्ट हिंदुराष्ट्र होऊ द्यायचे नाही, असा अभिप्रायच या पोटनिवडणुकीतून जनतेने दिला आहे.

आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाने लादलेल्या धोरणापोटी भारताचे आधीच गरीब आणि श्रीमंत असे दोन भाग पडले आहेत. रा.स्व.संघ/भाजप या आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाची तळी उचलून प्रचंड संख्येने असलेल्या गरिबांना आणखी दैन्याच्या खाईत ढकलत आहेत. नवउदार आर्थिक धोरण आणि कट्टर हिंदुत्ववाद यांच्या विषारी मिश्रणाचे पेय म्हणजे रा.स्व. संघ/भाजपची राजवट. ही राजवट म्हणजे कवी केशवसुतांच्या भाषेतला 'दु:खाचा प्याला'. त्यातल्या अनुभवाचा गाळ राबणाऱ्या जनतेच्या घशात ओतायची पराकाष्ठा रा.स्व.संघ आणि भाजप करत आहेत. पण या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने जनतेने स्पष्ट इशारा दिला आहे, 'हा दु:खाचा प्याला आम्ही कदापि डोळे मिटून पिणार नाही!'

या भारताचे रक्षण करण्यासाठी आणि अखिल भारतीयांच्या जीवनात चांगला बदल घडवून आणण्यासाठी आमच्या ओठांना लावलेला हा दु:खाचा प्याला दूर भिरकावून दिलाच पाहिजे. या दुष्ट शक्तीचे मर्दन केलेच पाहिजे. चला, कंबर कसूया!

*(अग्रलेख : 'पीपल्स डेमॉक्रसी')* **(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# नागपूर : खाजगी आय.टी.आय. निदेशक व कर्मचाऱ्यांची निदर्शने

नागपूर विभागातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये निदेशक आणि कर्मचारी गेल्या २० ते २५ वर्षांपासून कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (इपीएफ) लागू करण्यासंबंधी कर्मचारी भविष्य निर्वाह योजनेच्या आयुक्तांना अनेकदा निवेदने दिलीत. आजपर्यंत या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले तरीही त्यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचा कोणताच लाभ मिळालेला नाही. आयुक्तांकडे ही योजना लागू करण्यासंबंधी प्रत्यक्ष भेटी घेऊन या संबंधी माहिती करून दिली. त्यांनी ही योजना लागू करण्याचे आश्वासन दिले, परंतु या आश्वासनाची पूर्तता मात्र आजपर्यंत होऊ शकली नाही. ही बाब केवळ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या व्यवस्थापनास लाभ पोहचविण्यासाठी होत आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचे अधिकारी व्यवस्थापनाच्या दबावाखाली ही योजना लागू करीत नसल्याचे स्पष्ट होते.

या कर्मचाऱ्यांना तात्काळ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना सुरू करण्याच्या मागणीसाठी ४ ऑगस्ट रोजी निदेशक कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी योजनेच्या कार्यालयासमोर सीटू नेते अमृत मेश्राम यांचे नेतृत्वात निदर्शने करण्यात आली. या निदर्शनात विदर्भातील बहुतांश खाजगी आय.टी.आय.मधील निदेशक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या निदर्शनात विदर्भ ब्रेव्हरीज मजदूर युनियनचे बबन पवार, सतिश पाईक, बी. पी. इरगोचे भुपेंद्र भदोरिया, विठ्ठल नगरारे, स्पेस हुडचे रमा कवडे, सीटूचे ज्येष्ठ नेते भिमराव खोब्रागडे, व्ही. व्ही. आसई, अंगणवाडी कर्मचारी युनियनचे राजेंद्र साठे आदिंनी मार्गदर्शन केले. या कर्मचाऱ्यांसाठी बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेचे अध्यक्ष अमृत मेश्राम यांनी दिला.

**– अमृत मेश्राम**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वातंत्र्यदिनाचे भाषण बोलणे आणि चालणे - विरुद्ध दिशेने

**सीताराम येचुरी**

भारताचे नवे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या स्वातंत्र्यदिनाच्या प्रसंगी लालकिल्ल्याच्या तटावरून केलेल्या पहिल्या भाषणाला आरएसएस आणि भाजपच्या पारंपारिक ढोलताशे वाजविणाऱ्यांनी कौतुकाची दाद दिली. तसेच काही शासकीय लाभ अथवा आश्रय मिळावा किंवा पदाधिकाऱ्यांच्या लुटीतील भागीदारीसाठी आपली नियुक्ती व्हावी म्हणून कोणतीही तडजोड करण्यास तयार असलेल्या, मोदींच्या 'नव्या, मतपरिवर्तन झालेल्या चाहत्यांनी' आणि काही भूतपूर्व, आढ्यताखोर उदारमतवाद्यांनीसुद्धा नरेंद्र मोदींच्या भाषणाची दूरवर प्रशंसा केली.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर लगेच, स्वातंत्र्यदिनाच्या प्रसंगी पंतप्रधानांनी परंपरेनुसार देशाला उद्देशून केलेल्या भाषणाविषयी जनतेत कुतुहल असणे, किंवा जनतेच्या काही अपेक्षा असणे स्वाभाविक होते. स्वाभाविक म्हणण्याचे कारण असे की, ब्रिटिश वसाहतवादाच्या जोखडापासून आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, आपली उद्दिष्टे आणि आपल्या आशाआकांक्षा साध्य करण्याच्या आपल्या मार्गक्रमणात आपण कुठपर्यंत येऊन पोहोचलो आहोत, आणि विशेष महत्वाचे म्हणजे यापुढची वाटचाल आपण कशी करणार आहोत याचा आढावा/लेखाजोखा सामान्यपणे देशाचे पंतप्रधान स्वातंत्र्यदिनी जनतेपुढे मांडतात.

जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा स्वतंत्र भारताच्या प्रत्येक नागरिकाला अन्नसुरक्षेचा, आरोग्याचा, शिक्षणाचा आणि रोजगाराचा हक्क मिळेल; सर्वांची भरभराट होईल व स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून आपल्या सर्व क्षमता विकसित होण्याच्या संधी आपल्याला मिळतील अशा आपल्या अपेक्षा होत्या. थोडक्यात धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी प्रजासत्ताक राज्य घटनेवर आधारित एक चांगला भारत निर्माण होईल अशी एक आशा होती.

अमर शहीद भगतसिंगासारख्या असंख्य शहिदांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती दिली, तेव्हा त्यांच्या मनी एकच उत्कट इच्छा होती. ती ही की, आपल्याला मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचे रूपांतर संपूर्ण जनतेच्या खऱ्याखुऱ्या आर्थिक स्वातंत्र्यात होईपर्यंत आपला स्वातंत्र्यलढा चालू रहायला हवा. म्हणूनच स्वातंत्र्यलढ्याच्या या मार्गाने जात असताना, आपण कोणत्या टप्प्यापर्यंत आलो आहोत व यापुढची वाटचाल आपण कशी करणार आहोत – हा या ठिकाणी मुख्य प्रश्न आहे. आणि नेमक्या या कारणासाठीच दरवर्षी पंतप्रधानांच्या भाषणाकडे उत्कंठेने पाहिले जाते.

स्वातंत्र्यदिनी, पंतप्रधानांच्या भाषणासाठी दिल्लीच्या लाल किल्ल्याची निवड करण्यामागे कोणते संकेत होते याची काहींना जाणीव असेल. भारताच्या स्वातंत्र्याचा अरुणोदय झाला आहे हे आपल्या जनतेला आणि संपूर्ण जगाला जाहीरपणे कळविण्यासाठी, याच लाल किल्ल्यावर, ब्रिटिशांचा 'युनियन जॅक' खाली उतरवून भारताचा तिरंगा का फडकविण्यात आला होता? लाल किल्ला हे मोगल साम्राज्याचे प्रतीक होते. मोगलांनी तो बांधला, ज्यांना आरएसएस 'बाबर की औलाद' म्हणतो. मुस्लिमांपासून जेव्हा आपली मुक्तता होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळेल, असे आरएसएस आणि भाजप पहिल्यापासून मानत आले आहेत आणि अजूनही मानतात. स्वतंत्र भारताचे पहिले सरकार स्थापन करणाऱ्या, स्वातंत्र्यलढ्यातील आपल्या नेत्यांनी तिरंगा फडकाविण्यासाठी लाल किल्ल्याची निवड केली, कारण या किल्ल्याच्या तटावरूनच १८५७ साली भारतीय स्वातंत्र्याचा पहिला जाहीरनामा वाचून दाखविण्यात आला होता. १८५७च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये झांशीची बहादुर राणी लक्ष्मीबाई - एक अत्यंत धर्मनिष्ठ हिंदु, आणि तात्या टोपेंसारख्या अन्य नेत्यांनी, ब्रिटिशांपासून स्वतंत्र झालेल्या भारताचा शासक म्हणून मोगल सम्राट बहादुरशहा जफर यांची जाहीर घोषणा केली होती.

लाल किल्ल्याच्या या सांकेतिक महत्वाकडे दुर्लक्ष करून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील धर्मांध आणि जातीय हिंसाचार, येती १० वर्षे तात्पुरता थांबविण्याची किंवा त्यावर बंदी आणण्याची (मॉरेटोरिअम) विनंती केली. मुळात भारतासारख्या धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी, आधुनिक प्रजासत्ताक देशामध्ये अशा प्रकारच्या हिंसाचाराला कधीही थारा देता कामा नये. देशाचे पंतप्रधान या नात्याने जनतेला हे सांगण्याऐवजी १० वर्षांच्या हिंसाचार-बंदीविषयी बोलून त्यांनी नि:संदिग्धपणे एक गोष्ट सुचविली ती ही की १० वर्षांचा त्यांचा इच्छित कार्यकाळ धर्मांध दंगलींनी आणि ताणतणावांनी बाधित होता कामा नये. म्हणजे १० वर्षांनंतर, धार्मिक हिंसाचाराला उत्तेजन दिले किंवा त्याचे समर्थन केले तरी चालेल! जेणे करून आरएसएस/भाजपला पुन्हा एकदा केंद्रात सत्ता काबीज करण्यात यशस्वी होता येईल!

१० वर्षांच्या मॉरेटोरिअमची पंतप्रधानांची विनंती, केवळ जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्याची एक लबाड चाल होती, हे आरएसएस प्रमुखांनी स्वातंत्र्य दिनाच्या काही दिवस आधी १० ऑगस्टला कटक येथे केलेल्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. ते म्हणाले होते, ''इंग्लडमधील रहिवासी जर इंग्लिश आहेत, जर्मनीतील जर्मन आहेत, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेतील अमेरिकन आहेत तर हिंदुस्थानातील रहिवाशांना 'हिंदू' का म्हटले जात नाही? 'हिंदुत्व' ही सर्व भारतीयांची सांस्कृतिक ओळख आहे. आणि सध्या देशात राहणारे, या महान संस्कृतीचे वारसदार आहेत.''

याचा अर्थ आरएसएसच्या मते भारतात जे अन्यधर्मीय आहेत, धर्मनिरपेक्ष आहेत, त्यांना भारतीय नागरिक म्हणता येणार नाही. संविधान सभेमध्ये या प्रश्नावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर सभेने धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी भारतीय प्रजासत्ताकाचे स्वरूप विशद केले व भारतीय नागरिकत्वाचा प्रश्न फेटाळून लावण्यात आला. आरएसएसच्या 'भारतीय

नागरिक' या व्याख्येमधून अन्य धर्मीयांना व अधर्मीयांना वगळणारे अशा प्रकारचे वर्गीकरण 'भारत' या संकल्पनेलाच छेद देणारे आहे. आणि म्हणून या चुकीच्या वर्गीकरणाविषयी स्पष्टता यावी म्हणून आपल्या राज्य घटनेच्या कलम क्रमांक १ मध्ये आपल्या देशाची व्याख्या 'इंडिया म्हणजे भारत - एक संघराज्य' अशी करण्यात आली आहे. 'हिंदुस्थान' व इतर अनेक संज्ञांऐवजी 'भारत' ही सर्वसमावेशक संकल्पनेची संज्ञा निवडण्यात आली.

त्याच अनुषंगाने धर्म-जाती-लिंग निरपेक्ष अशी सर्व भारतीय नागरिकांची समानता अभिव्यक्त झाली आहे. पूर्वीपासून सांस्कृतिक विविधता आणि भिन्नता यांनी समृद्ध अशा 'भारत' या संकल्पनेच्या विरोधात राहिलेला आरएसएस आज देखील भारताचे हे वैविध्यपूर्ण वैशिष्ट्य नाकबूल करण्याचा प्रयत्न करीत असतो. धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी, आधुनिक भारतीय प्रजासत्ताकाचे रूपांतर आरएसएसला हव्या असणाऱ्या कट्टर असहिष्णू फॅसिस्ट हिंदू राष्ट्रात करण्याची आपली वैचारिक मोहीम पुढे रेटीत असतानाच देशभरातील वेगवेगळ्या प्रांतांमध्ये, विशेषत: ज्या ठिकाणी निवडणुका होऊ घातल्या आहेत त्या ठिकाणी धर्मांध तणाव वाढवून दंगे घडवून आणले जात आहेत, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भाषण एका अर्थी आरएसएसने चालू ठेवलेल्या अतिनिर्लज्ज अशा 'हिंदू व्होट बँक' राजकारणाचा म्हणजे बहुसंख्याक 'हिंदू व्होट बँक'चे धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा आरएसएसच्या प्रयत्नांचा भाग आहे असे म्हणावे लागते.

वास्तविकत: देशासमोरील मुख्य प्रश्नांसंबधी एका लांबपल्ल्याच्या दृष्टीची आवश्यकता (Vision) हा स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणाचा मुख्य विषय असायला हवा. परंतु पंतप्रधानांच्या भाषणात या दृष्टीचा प्रकर्षाने जाणवलेला अभाव हे या भाषणाचे प्रमुख वैगुण्य होते. 'स्वच्छता' आणि 'आरोग्यरक्षण' यांच्या उपयुक्ततेबद्दल नरेंद्र मोदी बोलले. मुलींसाठी वेगळ्या शौचालयाची गरज असल्याचे त्यांनी अधोरिखित केले. तसेच 'मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या आपल्या मुलांवर बारीक नजर ठेवा. त्यांना ताकीद द्या' असे आपल्या भाषणात त्यांनी पालकांना बजावले, 'वस्तुस्थितीची जाण असलेल्या व्यवहार्य बाबी' अशा शब्दात मोदींच्या नव्या चाहत्यांनी त्यांच्या भाषणाची भरभरून प्रशंसा केली. अधिक चांगली स्वच्छता हवी, महिलांसाठी स्वतंत्र शौचालये हवीत, या मुद्यावर विवाद होऊच शकत नाही. परंतु आम्ही ज्या लांब पल्ल्याच्या दृष्टीचा आधी उल्लेख केला होता; व जी पंतप्रधानांच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात अपेक्षित होती,ती दृष्टी या मुद्यांमध्ये दिसत नाही.

तथापि पंतप्रधानांनी आपल्या भाषणात काही नव्या योजनादेखील जाहीर केल्या आहेत. 'जन-धन-योजना' या त्यांच्या एका योजनेनुसार देशाच्या १५ कोटी नागरिकांसाठी बँकखाती उघडण्यात येतील व खात्यांद्वारे ५००० रु. रकमेच्या 'ओव्हरड्राफ्ट (शिल्लकीपेक्षा अधिक रक्कम)ची सवलत त्यांना दिली जाईल. तसेच १ लाख रुपयाच्या विम्याचे सुरक्षाकवच त्यांना मिळेल. समजा ही योजना कार्यान्वित झालीच तर कोणत्या बँका अशी बँकखाती नागरिकांसाठी उपलब्ध करून देतील? अणि कोणत्या विमा कंपन्या अशा विमा पॉलिसींची आर्थिक जबाबदारी पत्करतील? अर्थात फक्त राष्ट्रीयीकृत बँका आणि राष्ट्रीयीकृत विमा कंपन्या! या संदर्भात संसदेच्या पहिल्या महत्वपूर्ण सत्रात नरेंद्र मोदी सरकारने मांडलेल्या प्रस्तावाकडे पहा, म्हणजे त्यांच्या वरील घोषणा किती फसव्या आणि दांभिक आहेत याची कल्पना येईल. विमा क्षेत्रामध्ये 'थेट परकीय गुंतवणुकीची- (FDI) मर्यादा वाढविणारे प्रस्ताव सरळसरळ सार्वजनिक क्षेत्राला सुरुंग लावणारे आहेत. तसेच सार्वजनिक बँकक्षेत्राला डळमळीत करणारे असेच काही प्रस्ताव देखील सरकारच्या विचाराधीन आहेत.

शिवाय पंतप्रधानांनी आपल्या भाषणात नियोजन आयोग बरखास्त करण्याचा सरकारचा निर्णय जाहीर केला. वास्तविक जनतेसाठी लागणाऱ्या निधीवर देखरेख ठेवणे हे आतापर्यंत नियोजन आयोगाच्या अखत्यारीत असे. आणि तरीही हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पंतप्रधानांनी 'संसद आदर्श गांव योजना' अशी एक नवी योजना घोषित केली आहे. या योजनेतंर्गत प्रत्येक खासदाराने आपल्या मतदारसंघातील एका गावाची निवड करावी आणि 'एम.पी. लोकल एरिया डिव्हेलपमेंट स्कीम फंड' या ५ कोटी रुपयांच्या वार्षिक निधीमधून २ कोटी रुपये खर्च करून त्या गावाला 'आदर्श' गाव बनवावे. लवकरच या योजनेचा सर्व तपशील आपण स्वत:च जाहीर करू असेही पंतप्रधान म्हणाले. याचा अर्थ खासदारांची तथाकथित आवड-निवड नसल्यातच जमा!

शिवाय आपला देश, उत्पादन-प्रक्रियांचे मुख्य केंद्र झाला पाहिजे, संपूर्ण जगभरात 'उत्पादन क्षेत्रातील अग्रणी' म्हणून भारत उदयास आला पाहिजे; आणि आपल्या देशात केला जाणारा मालच ('मेड इन इंडिया') संपूर्ण जागाने वापरला पाहिजे असे पंतप्रधान गरजले. हे सर्व घडत होते जेव्हा इंग्लंडमध्ये चालू असलेल्या क्रिकेटच्या कसोटी सामन्यांमध्ये भारताचा संघ हरणार हे स्पष्टपणे दिसून येत होते. कुणीतरी खवचटपणे बोलले, ''पंतप्रधानांनी केलेल्या 'मेड इन इंडिया' या गर्जनेचा गांभीर्याने विचार फक्त भारताच्या क्रिकेट टीमने केला असावा. कारण 'धावा फक्त इंडियातच केल्या जातात' असे आपली टीम म्हणत असावी''. पंतप्रधानांची ही 'मेड इन इंडिया'ची इच्छा कितीही स्तुत्य असली तरी सध्याच्या जागतिक आणि भारतातील आर्थिक परिस्थितीत, ती सफल होणे साफ अशक्य आहे, विशेषत: त्यांच्या थोड्या कार्यकाळात तर नाहीच नाही!

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणामधून दोन गोष्टी उघडपणे दिसून आल्या. एक ही की, निवडणुकांच्या दरम्यान त्यांनी केलेल्या भाषणाचा कैफ त्यांच्या मस्तिष्कातून अजूनही ओसरलेला नाही. आणि दुसरी गोष्ट ही की 'भारताचे पंतप्रधान' या नव्या भूमिकेत ते अजूनही रुळले असल्याचे दिसत नाहीत. 'बोलबोल' बोलण्याची वेळ आता संपली आहे. आपण जे बोललो ते आता, भारत सरकारचे नेतृत्व करणारे नवे पंतप्रधान या नात्याने प्रत्यक्षात उतरविण्याची वेळ ('वॉक-द-टॉक' करण्याची वेळ) सुरू झाली आहे, हे त्यांना नम्रपणे सांगायला हवे. एकीकडे त्यांची आलंकारिक वक्तृत्वे पूर्वीसारखी अखंडपणे चालू आहेत आणि त्याचबरोबर त्यांच्या प्रत्यक्ष हालचाली मात्र विरुद्ध दिशेने जाणाऱ्या आहेत. 'व्होट बँक'चे अत्यंत निषेधार्ह असे राजकारण आणि धर्मांध ध्रुवीकरणाचे राजकारण अशी अत्यंत अधम आणि विघातक चाल सुरू झाली आहे.

म्हणूनच भारताच्या ६८व्या स्वातंत्र्यदिनाच्या प्रसंगी सर्व देशप्रेमीयांनी धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी आणि वैविध्यपूर्ण वारसा असलेल्या आपल्या देशाच्या बळकटीकरणासाठी-अर्थात 'भारत' या संकल्पनेच्या दृढीकरणासाठी एकत्र यायला हवे आणि एकजुटीने आपल्या प्रजासत्ताकाचे रक्षण करायला हवे आणि सर्व जनतेसाठी एका अधिक चांगल्या भारताची निर्मिती करण्यासाठी झटायला हवे.

**(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

# सामाजिक समता केंद्र

**सुलभा ब्रह्मे**

नितीन आगे हत्येमुळे दलितांवरील अत्याचाराचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शेख मोहसीन महंमद सादिकच्या हत्येने धर्मांध राजकारणाचा धोका स्पष्ट केला आहे. आदिवासी आणि भटक्या जमातींच्या लोकांवर आणि स्त्रियांवर होणारे अत्याचार ही तर नित्याचीच गोष्ट आहे. उत्तर प्रदेश, हरयाणा यांसारख्या राज्यांत गेल्या काही दिवसात स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांचे जणू पेवच फुटले आहे. देशभरात ह्या गंभीर आणि लोकशाही मूल्यांची धडधडीत गळचेपी करणाऱ्या अत्याचारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नितीन आगेची हत्या हा काही कधीतरी घडलेला प्रसंग नाही. गेल्या काही वर्षांत राज्यातील दलितांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मारहाण-बहिष्कारापासून ते थेट खून करण्यापर्यंत या अत्याचारांनी परिसीमा गाठली आहे. उठता-बसता फुले-शाहू आंबेडकरांना वंदन करणाऱ्या, सामाजिक समतेची शिकवण देणाऱ्या भक्तिसंप्रदायाची जन्मभूमी म्हणून इतिहास सांगणाऱ्या, पुरोगामी विचारांचे माहेरघर म्हणून गर्वाने मान ताठ करणाऱ्या महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे. २००२-०३ च्या दरम्यान हिलरी मायेल यांनी नॅशनल जिओग्राफिकमध्ये नोंदलेल्या पाहणीनुसार 'दर तासाला दोन दलितांवर हल्ला होतो; दर दिवशी तीन दलित स्त्रियांवर बलात्कार केले जातात, दोन दलितांचे खून होतात आणि दोन दलित घरे जाळली जातात.' दलित स्त्रियांवर बलात्कारांचे हे प्रमाण ३ वरून आता ४.३ झाले आहे!

अगदी नजीकच्या काळात राज्यातील दलितांवरील अत्याचारांच्या पुढील काही घटना, या अत्याचारांमागच्या कारणांची व्याप्ती स्पष्ट करतात. आरक्षणामुळे दलित-आदिवासींमध्ये शिक्षित थर निर्माण झाला आहे. महाविद्यालयातील काहीशा खुल्या वातावरणामध्ये मैत्रीच्या संबंधावरून धमक्या, छळ व प्रसंगी खुनापर्यंत भीषण क्रौर्य गाजवले जात आहे. खर्डा, देवपूर, मुळगाव इथल्या घटना हेच दाखवतात. आरक्षणामुळे सरपंचपदापर्यंत दलित पोहोचू शकत आहेत. त्या पदी विकासाची कामे नेटाने केल्यानेही खून पडत आहेत. जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातल्या नानेगावच्या सरपंचाचा नुकताच खून झाला, त्यामागे हे कारण होते.

विविध योजनांचा लाभ घेऊन दलितांनी प्रगती साधली तर पायरी सोडल्याने दलित टाचेखालचे मजूर राहत नाहीत म्हणून बहुजन समाज 'शिक्षा'(!) करतो. खैरलांजीतले भोतमांगे कुटुंबियांचे हत्याकांड म्हणजे क्रौर्याची परिसीमाच! तरीही दलित अत्याचार विरोधी कायद्याअंतर्गत गुन्हेगार म्हणून गुन्हा नोंदवला गेला नाही वा त्यांना पुरेशी शिक्षा झाली नाही.

गावगाड्याचा भाग नसलेल्या काही भटक्या जमातींवर गुन्हेगार जमातींचा शिक्का ब्रिटिशांनी बसवला. भारत स्वतंत्र झाला, तरी या जमाती मात्र स्वतंत्र झाल्या नाहीत, ना कायद्याच्या दृष्टीने, ना समाजाच्या दृष्टीने, काही वर्षांपूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यातल्या पारधी वस्तीवरचा हल्ला समाजाच्या क्रूरतेचीच साक्ष देतो.

आदिवासी समाजाची तर मुकी बिचारी कुणीही हाका, अशी परिस्थिती. कायद्याने कितीही अधिकार दिले, तरी ते प्रत्यक्षात मिळू न देण्यासाठी सारी व्यवस्था कामाला लागते. ठाणे जिल्ह्यातल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना फसवून, प्रसंगी धमकावून काढून बिल्डरांच्या घशात घातल्याची प्रकरणे वाढत आहेत.

धार्मिक भावना दुखावल्याचे निमित्त करून अल्पसंख्य समाजातील लोकांना लक्ष्य करण्याचे धर्मांध राजकारणाचे तंत्र पुरे मुरलेले आहे. १९९२ ते २००२ या दहा वर्षांच्या काळात देशाच्या विविध भागातील प्रयोगशाळांमध्ये तयार झालेले आणि २००२ साली गुजरातमध्ये रौद्र भीषण हत्याकांड करणारे हे रसायन सहिष्णुतेचा इतिहास गौरवाने मिरवणाऱ्या महाराष्ट्रातही आता राजरोसपणे वापरले जाऊ लागले आहे. पुण्यामध्ये दोन दिवस तंग केलेले वातावरण आणि मोहसीनची हत्या या रसायनांचे परिणाम स्पष्ट करतात.

या घटना थांबल्याच पाहिजेत. दलित-अल्पसंख्याकांना मूलभूत मानवी अधिकारही नाकारणाऱ्या प्रवृत्तींना आळा घातलाच पाहिजे. समतेवर आधारलेल्या समाजाची घडी बसवलीच पाहिजे. दलित-अल्पसंख्याकांवरील अत्याचारांच्या कारणांचा वेध घेऊन, त्यांना आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

स्वातंत्र्य व राजकीय सत्ता ही नवसमाज निर्मितीचे, स्वातंत्र्य व समता या मूल्यांवर आधारित निकोप व प्रगमनशील समाजउभारणीचे, साधन व्हावे असे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे ध्येय होते. म्हणूनच भारतीय घटनेत जातीधर्मनिरपेक्षता, सामाजिक-आर्थिक व राजकीय न्याय, दर्जा-संधी यांची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा, इत्यादी तत्वे अंतर्भूत केली गेली. अस्पृश्यता नष्ट करण्यात आली असे जाहीर केले गेले. आरक्षणाची तरतूद केली. परंतु, दलित-आदिवासी -भटक्या जमाती आणि धार्मिक अल्पसंख्य अशा भारतीय समाजाने तळागाळाशी लोटलेल्या समाजाची आर्थिक दुरवस्था आणि सामाजिक अन्याय, जुलुम, अत्याचार बेगुमानपणे चालू आहेत. एका बाजूला उच्चवर्णीयांच्या हातातील सत्ता-संपत्ती-सामाजिक प्रतिष्ठा यांचा माज आणि दुसऱ्या बाजूला अल्पसंख्य-दलित-आदिवासींची गरिबी व अगतिकता, अलगता. स्त्रिया या गरिबांमध्ये सर्वात गरीब आणि दलित, धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये त्या सर्वात दलित आणि शोषित पिडित आहेत.

लोकशाहीतील निवडणुकीच्या राजकारणामध्ये जातियतेचा, धार्मिकतेचा आधार घेणे राज्यकर्त्यांना विशेष लाभकारक असल्याने जातियता आणि धर्मांधतेला खतपाणीच घालणे चालू आहे. आर्थिक वाढीबरोबर आर्थिक विषमता वाढत गेल्याने आणि विशेषत: धरणे, खाणी, कारखाने, शहरे, महामार्ग, अशा तथाकथित विकास योजनांमुळे लाखो आदिवासी, शेतकरी यांचे विस्थापन होऊन ते देशोधडीला लागल्याने त्यांची विपन्नावस्था वाढलीच आहे. जागतिकीकरण पर्वात सार्वजनिक क्षेत्रांचा संकोच होत असल्याने नोकरीतील आरक्षणे मर्यादित झाली आहेत. शासकीय धोरणांमुळे शेती आतबट्ट्याची झाल्याने ज्या दलितांकडे अल्प जमीन होती तेही जमीन गमावत आहेत. शेतमजुरांची, बेकारांची संख्या वाढत आहे.

दलित-आदिवासींचा-अल्पसंख्यांकाचा आर्थिक प्रश्न हा जागतिकीकरणविरोधी संघर्षाचा भाग म्हणून व्यापक पातळीवर लढवावा

लागेल. गावपातळीवर श्रमिकांची एकजूट साधण्याचे प्रयत्न करून पाणलोटक्षेत्र विकास, कसणाऱ्याची जमीन, पाण्याचे समन्यायी वाटप, जमीन -पाण्याचे एकत्रित संयोजन, सहकारी शेती आदी लढ्यांमार्फत हाताळणे गरजेचे आहे. परंतु जातियतेच्या व धर्मांधतेच्या पगड्यामुळे सर्व श्रमिकांची एकजूट होत नाही. महाराष्ट्रातील ४० हजार खेड्यांमध्ये दलित-अल्पसंख्य समाज विखुरलेला आहे. प्रत्येक गावात त्यांची संख्या अल्प असल्याने तो एकाकी पडला आहे. त्यांच्या अगतिकतेचा फायदा घेऊन धनाढ्य जमीनदार वर्ग त्यांना टाचेखाली ठेवून आर्थिक शोषण व जुलूम जबरदस्ती करत आहे.

भारतामध्ये पुरुषसत्ताक कुटुंब व्यवस्था, पारंपरिक श्रेणीबद्ध जातीव्यवस्था आणि उच्चवर्णिय व उच्चवर्गीय यांची अधिसत्ता यामध्ये सत्तास्थानाचा गैरवापर करून घरीदारी, शाळेत, कामाच्या ठिकाणी व समाजात सर्वत्र दडपणूक, अन्याय, अत्याचार व हिंसा चालते आणि त्यामध्ये लाखो बालके, स्त्रिया, पददलित बळी पडतात. ही हिंसा थांबवलीच पाहिजे हा आग्रह धरणे आणि अशी हिंसा रोखणे हे प्रत्येकाचे सातत्याने व सर्वत्र अंमलबजावणी करण्याचे आचरण आहे ते आत्मसात करणे अगत्याचे आहे. एकंदरीतच पुरुषसत्ताकता, जातपंचायती व उच्चजाती व उच्चवर्ग यांची हुकमत आणि धार्मिक बहुसंख्याकांचे धर्मांध वर्चस्व याचे उच्चाटन करण्यासाठी विविध पातळीवर प्रबोधन, संघटन व आंदोलने-लढे करत राहीले तरच कुटुंबात व समाजात समानतापर व भ्रातृभावी संबंध निर्माण करून हिंसेला आळा घालता येईल.

**काय केले पाहिजे** ?

महाराष्ट्रामध्ये प्रतिवर्षी अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ खाली नोंदलेली प्रकरणे सरासरीने १७००. न नोंदलेली असंख्यच. पोलीस यंत्रणा जातियवादी असल्याने नोंद घेतली जात नाही. नीट तपासणी, जबाब, पुरावा गोळा केला जात नाही. आरोपींवर गुन्हा सिध्द होऊन शिक्षा, होण्याचे प्रमाण केवळ ३-८ टक्के आहे, असे अनेक सरकारी -गैर सरकारी संस्थांच्या अभ्यासांमध्ये नोंदले आहे. राज्यकर्ते, पोलीस, नोकरशाही, बहुजन समाज या सर्वांमध्ये जातीयवादी शक्ती ताकदवान असल्याने कायद्याची परिणामकारकता मर्यादितच राहिली आहे. दलितांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे ही सर्वात महत्वाची पूर्वअट आहे. जाती अंताच्या लढ्यातील सर्वांनीच या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीची मागणी लावून धरली पाहिजे.

सच्चर आयोगाने मुस्लिम समाजाच्या विकासाच्या प्रश्नावर बोट ठेवले आहे. शिक्षण, रोजगार अशा बाबतीत मुस्लिम समाज मागास आहे. या समाजातील व्यक्तींच्या विकासासाठी योग्य धोरणे राबवण्याची सच्चर आयोगाची शिफारस अंमलात आणण्यासाठी राजकीय दबाव वाढवण्याची गरज आहे.

दलित, आदिवासी, भटके, अल्पसंख्याक आदी पददलितांना व स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी निरनिराळ्या आघाड्यांवर कामगार -कर्मचारी संघटना, सामाजिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठ प्राध्यापक-शिक्षक संघटना, महिला संघटना अशा संस्था व व्यक्तींनी आपापल्या कुवतीप्रमाणे खारीचा वाटा उचलला आणि अशा कामामध्ये समन्वय साधला तर निश्चित प्रगती साधता येईल. घरात व घराबाहेर स्त्रियांवरील कळत नकळत, अंगवळणी पडलेल्या हिंसेला तोंड फोडणे व ही हिंसा थांबवण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे समाजातील वाढत्या हिंसेला आळा घालणेच आहे ह्या जाणीवेतून प्रत्येक अत्याचाराच्या प्रश्नाकडे पहाणे जरूरीचे आहे.

पददलित व स्त्री-मुक्ती आंदोलन हे समाजपरिवर्तनाचे आंदोलन आहे. समाजपरिवर्तनामध्ये माणसामाणसातील संबंधांत मूलगामी बदल अभिप्रेत आहेत अशा आंदोलनास सर्व जनतेची सहानुभूती व पाठिंबा मिळवणे कळीचे आहे. अशा कामासाठी आपापल्या भागात सामाजिक समता केंद्र स्थापन करावे व त्यामार्फत पुढील प्रकारचे प्रबोधनात्मक व कृतिशीलतेचे काम करावे, असा प्रस्ताव ठेवत आहोत.

**सामाजिक समता केंद्र**: तालुक्याची गावे, मोठी गावे या पातळीवर सामाजिक समता केंद्रे उभी करावीत. एका केंद्रासाठी ४-५ सदस्यांची एक कार्यकारी समिती नेमावी. समितीचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी सचिवाची नेमणूक करावी. कार्यालयासाठी जागेची सोय व आठवड्यातून किमान एक दिवस सायंकाळी किंवा रविवारी कार्यालय चालू ठेवावं.

सामाजिक समता केंद्रांमध्ये अनुसूचित जाती, जमाती, भटके, विमुक्त, स्त्रिया, मुले यांच्यासाठी शासनाच्या योजनांबाबतच्या माहितीपुस्तिका, त्यांच्या संदर्भातील खास कायद्यांची माहिती पुरविणारे साहित्य व सदर प्रश्नांसबंधी प्रबोधनात्मक साहित्य उपलब्ध करावे. दैनंदिन आयुष्यात समानता यावी ह्यासाठी समान वेतन कायदा , लैंगिक शिवीगाळ, जातीय गाभा व त्यातील उतरंड मोडण्यासाठी समानता, मानवता ह्या मूल्यांची कास धरण्यासाठी काही उपक्रम राबवले जातील ते सर्व सामाजिक वैविध्याला सामावून घेणारे असतील.

सामाजिक समता केंद्राने समिती सदस्यांच्या सवडीप्रमाणे व क्षमतांप्रमाणे पुढीलपैकी उपक्रम घ्यावेत:

१. दलित, आदिवासी, भटके, विमुक्त व अन्य पददलित, अल्पसंख्य व स्त्रिया यांच्यावर अन्याय होत असेल तर त्याबाबत केंद्राकडे समस्या नोंदवण्याची व्यवस्था करून संवाद, चर्चा अशा सामोपचाराच्या मार्गाने समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन व प्रयत्न. असे प्रयत्न निष्फळ झाले तर शासनाच्या समाजकल्याण केंद्राद्वारे प्रयत्न.

२. गुन्हा घडल्यास त्याची तक्रार दाखल करण्यास मदत, पुरावा-साक्षी व्यवस्थितपणे होण्यास हलगर्जीपणा केला जात असल्यास त्याबाबत दक्षता. बाधित कुटुंबाला जरूर ती मदत मिळवण्यासाठी प्रयत्न. जरूर तो कायदा सल्ला उपलब्ध करणे.

३. दाखले, माहिती मदत देण्याबाबत विविध शासकीय अधिकारी, व तक्रार नोंद आदींबाबत पोलीस दुर्लक्ष करत असतील, तर त्यातून मार्ग काढण्यासाठी मदत.

४. स्त्रिया, दलित, आदिवासी व अन्य मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक, आर्थिक व अन्य योजना, कायदेशीर तरतुदी याबाबत माहिती पुरवणे. त्यासंबंधी अंमलबजावणीबाबत अडचणी असल्यास त्या निवारण्यासाठी मदत.

५. नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती यांच्याद्वारा पददलित व स्त्रिया यांच्यासाठीच्या विविध योजनांची अंमलबजावणी होण्यातील समस्या सोडवण्यास मदत. या खास योजनांखालील निधीचा सुयोग्यरित्या वापर व्हावा यासाठी प्रयत्न.

६. समान वेतन आणि किमान वेतन सारखे कायदे प्रत्यक्षात यावेत ह्यासाठी प्रयत्न.

७. आंतरजातीय विवाहांना मदत करणे.

८. दलित, आदिवासी, भटके, विमुक्त जाती, अल्पसंख्याक व स्त्रियांवरील अत्याचारांसबंधातील परिस्थिती व त्यासंदर्भातील अडचणी याविषयी उपलब्ध माहितीचे संकलन व शक्य असेल त्याप्रमाणे प्रत्यक्ष पाहणीद्वारा स्त्रिया व पददलितांच्या समस्यांबाबत माहिती संकलन केले तर कामाला अभ्यासाची जोड मिळेल. अभ्यासाद्वारे जमवलेल्या माहितीच्या आधारे लेख, पुस्तिका, गोष्टी, कविता, पोवाडे, पथनाट्य, भारूड, इ. प्रबोधनात्मक साहित्यनिर्मिती करून व्यापक पातळीवर जनप्रबोधन करणे शक्य होईल. शिक्षणाच्या विविध स्तरांवरच्या क्रमिक पुस्तकांची छाननी करून जातजमातवाद पोषक, स्त्री-पुरुष भेदभावपोषक मजकूर आढळल्यास तो वगळण्यासाठी व समतापोषक लिखाण समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणेही महत्वाचे आहे. म्हणजे शालेय स्तरावरूनच मुलांमध्ये जाती-धर्मविरहीत व स्त्री-पुरुष समानतेची मूल्ये रुजण्यास मदत होईल.

**९. समता मंडळे** :- आपल्या भागात प्रबोधनाचे काम करण्यासाठी गावोगावी, विविध संस्था-संघटना, शाळा, महाविद्यालये, कचेऱ्या, वस्त्या, सोसायट्या येथे कार्यरत असलेली विविध मंडळे तयार असल्यास त्याद्वारा अथवा नव्याने समता मंडळे स्थापन करून त्यामार्फत सामाजिक समतेस पोषक असे शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रम आणि महात्मा फुले, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, अमरशेख, सावित्रीबाई फुले दिन, महिला दिन, कामगार दिन, वादसभा, चर्चासत्र, नाट्य-कविता सत्रे असे अनेक प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करावे. समता मंडळांना विविध साहित्य पुरवणे, जरूरीप्रमाणे सल्ला, मार्गदर्शन करणे. चर्चा, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनास सामाजिक समता केंद्राने मदत करावी.

पुणे येथील शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाद्वारा (सचिव-सुलभा ब्रह्मे) सर्व सामाजिक समता केंद्रांशी संपर्क ठेवण्यात येऊन आवश्यक ते साहित्य पुरवणे, आणि केंद्रांकडून येईल ती माहिती सर्व केंद्रांना पाठवणे अशी समन्वयाची जबाबदारी घेतली जाईल. वरील प्रस्तावाबाबत सूचना अवश्य पाठवाव्या. आपल्या गावी सामाजिक समता केंद्र सुरू करणे आपणांस शक्य वाटत असेल तर जरूर संपर्क साधावा.

**संपर्काचा पत्ता** : सामाजिक समता केंद्र,
द्वारा सुलभा ब्रह्मे, १२९ब/२, एरंडवणे, पुणे - ४११००४.
दूरध्वनी : ०२०-२५४३२९३३;
ई-मेल : sulabhabrahme2013@gmail.com

## (जाती अंत संघर्ष समिती... पान २ वरून)

त्यानंतर जाती अंत संघर्ष समितीचे मुंबईचे निमंत्रक सुभाष थोरात यांनी ठराव मांडला. ठराव मांडताना केलेल्या भाषणात त्यांनी सामाजिक, आर्थिक सुधारणेच्या दृष्टीने ऐतिहासिक अशा मुंबई शहरातील जातीविरोधी लढ्याचा, प्रबोधनाचा त्या त्या काळात घडलेल्या घटना, झालेल्या परिषदा यांची उदाहरणे देत आढावा घेतला व जाती अंताचा प्रश्न अखेरीस समग्र समाजातील परिवर्तनाच्या प्रश्नांशी जैवपणे निगडीत असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. वर्ग अंत आणि स्त्रीदास्य अंत ही वेगवेगळी दिसत असली तरी त्याच समतेच्या लढ्याची अंगे आहेत. त्यामुळे जाती अंताच्या संघर्षात या समग्रतेचे भान बाळगणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी केरळ व प.बंगालमधील कम्युनिस्ट सरकारांची उदाहरणे दिली व त्यांच्या सत्ताकाळात केलेल्या जमीन सुधारणा, जमीन वाटपाचे धोरण तसेच प. बंगालमधील त्रि-स्तरीय पंचायत राज व्यवस्थेची अंमलबजावणी व त्यामुळे तेथील दलित-आदिवासींच्या हातात आलेली सत्ता याचा जाती अंताच्या संदर्भात अनुकूल परिणाम दिसून आल्याचे आणि या राज्यात देशातील इतर राज्यांच्या तुलनेत दलित-आदिवासींवरील अत्याचारांचे प्रमाणही नगण्य असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. आपल्या भाषणाच्या अखेरीस सुभाष थोरात यांनी एकीकडे जातिव्यवस्थाविरोधी आंदोलनाचे नायक चार्वाक, गौतम बुध्द, महावीर, गुरु नानक, बसवेश्वर, चक्रधर, कबीर, तुकाराम, फुले, शाहू, आंबेडकर, पेरियार यांच्या सोबतीला मार्क्स, एंगल्स, लेनिन, माओ यांना घेतल्याशिवाय आपण ही जाती अंताची लढाई जिंकू शकणार नाही असे प्रतिपादन केले.

या ठरावाला अनुमोदन देताना अशोक बॅनर्जी यांनी विविध उदाहरणे देत जातिव्यवस्थेचे विश्लेषण केले व आताच्या काळात जातिव्यवस्था कालबाह्य झाली असून तिला समूळ नष्ट केले पाहिजे असे प्रतिपादन करून या ठरावाला सर्वांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन केले.

त्यानंतर ठरावावरील चर्चेत के. प्रकाशन, कविता वरे, संगीता कांबळे, मिलिंद खरे, डॉ. रवींद्र मदने यांनी भाग घेतला. या चर्चेतून आलेल्या सूचनांचा समावेश ठरावात करण्याचे मान्य करीत सुभाष थोरात यांनी चर्चेत उपस्थित झालेल्या मुद्यांना समर्पक उत्तर दिल्यानंतर ठराव एकमताने संमत करण्यात आला.

त्यानंतर अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रमेश कांबळे यांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात नवउदारवादी धोरणांच्या अंमलबजावणीच्या काळात बदलत असलेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा समर्पक आढावा घेतला व या बदलत्या परिस्थितीतील जातिव्यवस्थेच्या स्वरूपाचा उहापोह केला. दलितांवर होत असलेले अत्याचार हे जणूकाही एखादी सुटी घटना आहे असेच त्याकडे पाहिले जात आहे ती या जातिव्यवस्थेच्या परिणामी घडलेली आहे याचे भान जाणिवपूर्वक बाजूला सारले जात आहे. जातीच्या प्रश्नाकडे समग्रतेने पाहिल्याशिवाय जाती अंताचा संघर्ष यशस्वी करता येणार नाही असे प्रतिपादन करीत त्यांनी आपल्या भाषणाची अखेर केली.

शैलेंद्र कांबळे यांनी सर्व उपस्थितांचे व प्रमुख पाहुण्यांचे आभार मानल्यानंतर अधिवेशनाची सांगता झाली.

**– राजीव देशपांडे**


## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी

**जीवनमार्ग - रु. ३००, लोकलहर - रु. २००, पीपल्स डेमॉक्रसी - रु. २५०, मार्क्सिस्ट - रु. १००**

***आपल्या संपूर्ण पत्त्यासहित मनी ऑर्डर/बँक ड्राफ्टने वर्गणी पाठविण्याचे पत्ते***

**व्यवस्थापक, जीवनमार्ग, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३**
**इतर मुखपत्रे : मॅनेजर, लोकलहर, १५ तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११०००१**

# ५ ऑगस्ट रोजी वैद्यकीय प्रतिनिधींच्या देशव्यापी निषेध आंदोलनात राज्यभरातील १४२५ वैद्यकीय प्रतिनिधींचा सहभाग







देशभरातील सुमारे २ लाख वैद्यकीय व विक्री प्रतिनिधींना 'सेल्स प्रमोशन एम्प्लॉईज (कंडिशन्स ऑफ सर्व्हिस) अॅक्ट - १९७६' या केंद्रीय कायद्याचे संरक्षण मिळविण्यात 'FMRAI' फेडरेशनने यश मिळविले. २०१३ मध्ये केंद्र शासनाने औषध व अन्य उद्योगांतील विक्री संवर्धन कर्मचाऱ्यांकरिता औद्योगिक त्रिपक्षीय समितीचे गठन केले होते. त्यामुळे गेल्या ५० वर्षांच्या संघर्षातून लागू झालेल्या कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा करण्याकरिता 'व्यासपीठ' मिळाले असे समाधान सभासदांमध्ये होते. परंतु 'अच्छे दिन आयेंगे' असे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या मोदी सरकारने नुकतीच 'त्रिपक्षीय समिती' रद्द केली. यामुळे लोकशाही माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा मार्ग बंद झाला व मालकवर्गाला शोषण तीव्र करण्याची मुभा मोदी सरकारने दिली आहे.

म्हणूनच ५ ऑगस्ट २०१४ रोजी फेडरेशनच्या हाकेनुसार महाराष्ट्र राज्यातील १४२५ प्रतिनिधींनी जोरदार निषेध निदर्शने केली. एकूण २२ जिल्हा शाखांनी लोकसभेच्या सभापती सुमित्रा महाजन यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मोदी सरकारच्या लोकशाहीविरोधी निर्णयाविरुद्ध निवेदने पाठविली.

तसेच २०११ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या कामगार मंत्र्यांनी वैद्यकीय प्रतिनिधींकरिता कामाच्या वेळा निश्चित करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यांनी १५ जानेवारी २०१४ रोजी त्रुटी असलेले, ज्यामुळे कामाचे तास १० करण्याचे नोटिफिकेशन काढले. याचा निषेध करून मुख्यमंत्री ना. पृथ्वीराज चव्हाण यांनाही निवेदने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पाठविली.

**– मुकुंद रानडे**

# जालना जिल्हा दुष्काळी जाहीर करावा यासाठी माकपतर्फे धरणे




जालना जिल्हा दुष्काळी जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना एकरी रुपये २५,०००/- रु. नुकसान भरपाई द्यावी, प्रत्येक गावात मनरेगा अंतर्गत काम द्यावे, जिल्ह्यातील सर्व पाण्याचे साठे राखीव करावे, शेतकऱ्यांची सर्व प्रकारची कर्जे व वीज बिले माफ करावी, जनावरांना चारा छावण्या सुरू कराव्यात इत्यादी मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने २० ऑगस्ट रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी पक्षाचे कार्यकर्ते रस्त्यावर धरणे धरून बसले. पक्षाचे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी, जालना यांना भेटले. यावेळी झालेल्या सभेत अण्णा सावंत, मधुकर मोकळे, गोविंद आर्दड, रावसाहेब बागल, शिवाजी मराडे, अनिल मिसाळ यांनी मार्गदर्शन केले. **– अण्णा सावंत**

**आगामी विधानसभा निवडणुकीत सर्वशक्तीनिशी उतरून महाराष्ट्र डाव्या लोकशाही समितीला अधिकाधिक ठिकाणी विजयी करा!**